**डॉ. पराग सहस्त्रबुद्धे**
प्लास्टिक सर्जन

# सॅनिटायझर बर्न्स टाळणे शक्य

सॅनिटायझरची बाटली स्वयंपाकघरात ओट्यावर ठेवून स्वयंपाक करताना एक महिला ३० टक्के भाजल्याची घटना नुकतीच घडली. सुदैवाने घरामध्ये बाकी कोणालाही इजा झाली नाही. योग्य त्या उपचारांनंतर ही महिला बरी झाली आहे. अधिक खोलामध्ये जाऊन विचारणा केली तेव्हा समजले की ही महिला हाताला सॅनिटायझर लावत स्वयंपाकघरात गेली होती आणि

**आरोग्यमंत्र**

सॅनिटायझरची बाटली तिने गॅसच्या शेगडी जवळच ठेवली होती. त्यानंतर तिने गॅस पेटवण्याचा प्रयत्न केला. या प्रकारात सॅनिटायझरच्या बाटलीचा भडका उडाला .

वैद्यकीय क्षेत्रामध्ये सॅनिटायझरचा वापर नवीन नाही. आयसीयू, ऑपरेशन थिएटरमध्ये डॉक्टर हँड सॅनिटायझर नेहमी वापरतात. या सर्व सॅनिटाझरवर किंवा हँड डिसइन्फेक्टंटवर 'ही वस्तू सहज पेट घेणारी आहे. त्यामुळे आगीच्या जवळ ठेवू नये' अशी सावधगिरी बाळगण्याबाबतची सूचना छापलेली असते.

करोनाच्या साथीमुळे आपल्या सर्वांचे आयुष्य बदलले आहे. हातांच्या स्वच्छतेसाठी सॅनिटायझरचा वापर वाढला आहे. सॅनिटायझरच्या मागणीत वाढ झाल्याने अनेक नवीन कंपन्या सॅनिटायझरची निर्मिती करीत आहेत. मात्र, या वाढलेल्या वापरामुळे 'सॅनिटायझर बर्न्स'च्या घटनाही वाढल्या आहेत.

सॅनिटायझरमधील अनेक घटकांपैकी एक घटक हा अल्कोहोल असतो. सॅनिटायझरमध्ये अल्कोहोलचे प्रमाण ६० ते ९५ टक्के असते. त्यामुळे सॅनिटायझर पटकन पेट घेऊ शकते. बाजारात मिळणाऱ्या सॅनिटायझरवर वर उल्लेख केलेल्या सूचनेप्रमाणे खबरदारी घेण्याबाबतची सूचना छापलेली नसते. त्यामुळे अशाप्रकारे भाजणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. सॅनिटायझर वापरताना खबरदारी घेण्याची सूचना छापणे कायद्याने बंधनकारक केल्यास सर्व जण योग्य ती काळजी घेतील आणि अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत.

काही सॅनिटायझर जेल बेस्ड आहेत. त्यामुळे हात चिकट होतात व सॅनिटायझर हातावर बराच वेळ राहतो. असा सॅनिटायझर वापरल्यावर निरांजन किंवा उदबत्ती लावणे, कारचे इग्निशन चालू करणे, सिगारेट ओढणे, शेकोटी पेटवणे असे प्रकार करू नयेत.

## सॅनिटायझर वापरताना हे लक्षात ठेवा



- प्रत्येक सॅनिटायझरच्या बाटलीवर सावधगिरी बाळगण्याबाबतची सूचना असली पाहिजे.
- लहान मुलांपासून सॅनिटायझरची बाटली दूर ठेवा.
- सॅनिटायझर हातावर घेतल्यावर लगेचच आगीच्या किंवा कोणत्याही ज्वलनशील वस्तूजवळ जाऊ नका. उदा. स्वयंपाकघरातील गॅस, बॉयलर, इलेक्ट्रिक स्पार्क उडू शकतो अशा गोष्टी, हॉट मेटल, वेल्डिंग आदी.
- सॅनिटायझर वापरल्यानंतर बाटलीचे झाकण नीट बंद आहे ना, याची खात्री करा. सॅनिटायझरची बाटली उन्हात ठेवू नका.
- प्रत्येक वेळेस सॅनिटायझरच वापरला पाहिजे असे नाही. साबणाने हात धुतले तरी तेसुद्धा तेवढेच उपायकारक आहेत. सॅनिटायझर वापरल्यानंतर हात पूर्ण कोरडे झाल्यानंतरच कुठल्याही वस्तूला हात लावा.